# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 फॅक्स क्र. 0712-2561663

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


क्र.तशिस/प्राकाना/शैवि/NSP Portal/2020/ 1848

दिनांक:- 27 AUG 2020

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व पदवी/पदव्युत्तर पदवी तसेच पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- **महाडीबीटी पोर्टवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत...**
संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. 18/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/2020/190, दिनांक 26/08/2020

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सन 2019-20 साठी **MAHADBT Portal** वरील समावेशीत विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी 1) **राजश्री छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** 2) **डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना** 3) **उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग-1 वैद्यकीय अभ्यासक्रम वगळुन)** या योजनांकरीता अर्ज केलेल्या व अशा विद्यार्थ्यांचे संस्थास्तरावर प्रलंबीत असलेले अर्ज आपल्या संस्था Login मध्ये पडताळणी करुन त्वरीत या कार्यालयाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात यावे जेणेकरुन सदर विद्यार्थी हे योजनेपासुन वंचित राहणार नाहीत.

प्रलंबीत राहीलेले अर्ज निकाली काढण्याकरीता महाडीबीटी पोर्टलवर जाहीर केलेल्या नवीन वेळापत्रकानुसार संस्थांसाठी दिनांक 10/09/2020 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तरी सस्थांनी आपल्या संस्थास्तरावर प्रलंबीत सर्व अर्ज तात्काळ आणि विहित मुदतीत निकाली काढण्याकरीता सर्व संस्थांनी त्यांच्या Login मध्ये प्रलंबित असलेले अर्ज पडताळणी करुन या कार्यालयाकडे त्वरीत पाठवावे तसेच जे अर्ज या कार्यालयाकडुन संस्थेकडे Sent back to applicant केलेले आहेत हे अर्ज त्वरीत विद्यार्थ्यांना Revert करुन त्यांचेकडून त्रुटीची पुर्तता करुन परत या कार्यालयाकडे मान्यतेस पाठवावे व जे विद्यार्थी त्रुटींची पुर्तता करु शकत नसतील अशा विद्यार्थ्यांचे अर्ज त्वरीत reject करावे जेणेकरुन प्रलंबित अर्जाची संख्या वाढणार नाही.

तरी सर्व संस्थांनी प्रलंबित अर्जाच्या पडताळणीची प्रक्रीया विहित मुदतीत पुर्ण करण्यात यावी जेणेकरुन एकही प्रलंबित विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहणार नाही जर विद्यार्थी संस्थेच्या चुकीमुळे या लाभापासुन वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. राम निबुदे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण वि.का., नागपूर

- संदर्भीय पत्र संलग्न

F:\data bac\my General Letter ISM 06 for deo1.docx

F/C

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ - ई-मेलद्वारे/स्पीड पोस्टद्वारे

क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१९०
दिनांक : २६/०८/२०२०

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या कार्यवाहीसाठी वाढीव मुदतीबाबत ......

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७० दि.२३/१२/२०१९
२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९ दि.२८/०२/२०२०
३. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७ दि.२०/०५/२०२०
४. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१४२ दि.०१/०६/२०२०
५. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१५५ दि.०८/०७/२०२०

महोदय,

**आपले सरकार** डी.बी.टी.पोर्टल ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला असून त्यामधील खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१, वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टलवरील** उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, सर्व विभागीय कार्यालयांना त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संस्थांच्या लॉगीनमध्ये योजनांसाठीचे विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या मुदतवाढीच्या कालावधीमध्ये प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते तसेच **" विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी पोर्टलवर वेळोवेळी जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार आपापल्या स्तरांवरील कार्यवाही न चुकता पूर्ण करावी."** असेही कळविण्यात आलेले होते. तरीदेखील काही विद्यार्थ्यांचे अर्ज मुदतीमध्ये तपासणी न केल्याने संस्थांस्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून त्याबाबतचा पोर्टलवरील विभागनिहाय अहवाल सोबत जोडला आहे. तरी शासनाने प्रलंबित अर्जांची तपासणी करुन निकाली काढण्यासाठी सोबत जोडलेल्या महाडीबीटी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार संस्थांसाठी **दि.१०/०९/२०२० पूर्वी** व कार्यालयांसाठी **दि.१५/०९/२०२० पूर्वी** निकाली काढण्याबाबत सूचित केले आहे.

तरी सर्व विभागीय कार्यालयांना या पत्राद्वारे सुचित करण्यात येतें की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व संस्थांना, संस्थांच्या लॉगीनआयडी अंतर्गत तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज तसेच Sent Back ( Revert झालेले ) अंतर्गत असलेल्या अर्जाची त्रुटी दूर करुन अंतिम दिनांकापूर्वी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जाची तपासणी करुन निकाली काढण्याबाबत सूचित करावे. तसेच, सर्व विभागीय कार्यालयांनीदेखील त्यांच्या लॉगीन आयडीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जाची संबंधित योजनेच्या शासन निर्णयानुसार सर्व प्राप्त अर्जाची तपासणी दि.११/०९/२०२० पूर्वी करुन निकाली काढावेत. तसेच संस्था व विभागीय स्तरांवर कोणतेही अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता सहसंचालक यांनी स्वत: घ्यावी. तसेच विद्यार्थी / संस्था / विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये Sent Back अंतर्गत व तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज अंतिम तारखेनंतर सिस्टिमद्वारे Automatic नामंजूर करण्यात येतील व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील आणि यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला,

( डॉ. अभय वाघ. )
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

सोबत - वरीलप्रमाणे .

प्रत : यांना माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षणविभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-३२

२) मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२

३) मा. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, ५ वा मजला, मंत्रालय ॲनेक्स बिल्डिंग, मादाम कामा रोड, मुंबई.

ibtworkflow.mahaonline.gov.in

Dear Insti... ...em 1st August 2019. Please refer the notic...

## Important Dates

| | |
|---|---|
| Institute Profile Update and Approval by FRA/ SSS/ Dept. before | 2020 January 15 |
| Institute Scrutiny for Merit Schemes before | 2020 September 10 |
| Department Scrutiny for Merit Schemes before | 2020 September 15 |
| Institute Scrutiny for Other schemes - 1st Installment before | 2020 September 10 |
| Department Scrutiny for Other Schemes - 1st Installment before | 2020 September 15 |

Login

**Directorate of Technical Education, M.S., Mumbai**

**DBT Dashboard** [Last Report Updated: 18/08/2020 05:12:39]

F.Y.2019-2020

| Division | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Cancelled | Pending At Department | Rejected | Sent back to applicant |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Amravati | 8,061 | 6,493 | 76 | 6,493 | 1,133 | 0 | 58 | 301 |
| Aurangabad | 46,858 | 35,280 | 237 | 35,280 | 8,474 | 0 | 678 | 2,189 |
| Mumbai | 49,614 | 39,000 | 177 | 39,000 | 8,667 | 0 | 312 | 1,458 |
| Nagpur | 14,831 | 11,799 | 53 | 11,799 | 2,154 | 0 | 441 | 384 |
| Nashik | 39,216 | 32,332 | 270 | 32,332 | 5,475 | 0 | 422 | 717 |
| Pune | 1,65,311 | 1,32,719 | 345 | 1,32,719 | 29,874 | 0 | 543 | 1,830 |
| Total | 3,23,891 | 2,57,623 | 1,158 | 2,57,623 | 55,777 | 0 | 2,454 | 6,879 |